ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ

MATHS MELA

गणित पर्वणी

Textbook of Mathematics

PART - 2

CLASS



मराठी माध्यम

MARATHI MEDIUM

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

विद्यया ऽमृतमश्नुते

एन सी ई आर टी
NCERT

राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद्
NATIONAL COUNCIL OF EDUCATIONAL RESEARCH AND TRAINING

Karnataka Textbook Society (R.)
6th Cross, Malleshwaram, Bengaluru - 560 003.

अनुक्रमणिका

I3K2Y8

8.	वजनकरा आणि ओता	1-14
9.	समान गट	15-37
10.	हत्ती वाघ आणि चित्ते	38-52
11.	सममितीच्या गमती-जमती	53-64
12.	टिक्-टिक् घडयाळे आणि दिनदर्शिका	65-73
13.	वाहतूळ संग्रहालय	74-93
14.	माहिती हाताळणे	94-100


© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण
8

वजन करा आणि ओता

P2N5G4





आम्ही इयता 3 री मध्ये वजन व आकारमान यांचे मोजमाप करणे शिकलो आहोत. तुम्हाला आठवते का 1 कि.ग्रॅ. मिठाची पिशवी आणि 1 लिटर बाटली? चला मग आता वजन आणि आकारमान मोजण्याबद्दल अधिक शिकुया.

1. समोर दिलेले चित्र पहा आणि जास्त वजन असणाऱ्या प्राण्यापासून कमी वजन असणाऱ्या प्राण्यांची नावे लिहा.

   .....

2. तुझ्या घरातील सर्वात जास्त वजनाच्या वस्तुचे नाव लिही तुला ते कसे समजले?

   .....



3. तु तुझा दप्तर सहज घेऊन जातोस कि नेण्यास जड वाटतो?

   .....

4. तुझ्या दप्तरातील सर्वात जड पुस्तक कोणते? तुला ते कसे समजले ?

   .....


5. तुझी उंची किती आहे? तुला ते कसे समजले?

@YTBS NOT TO BE REPUBLISHED

भाजी मंडीतील मजा

रीटा आणि शबनम फळे आणि भाजी विकत घेण्यासाठी बाजारात जातात. त्यानी भाजी विक्रेत्याला वजन करताना पाहिले.





अर्ध्या भोपळ्याचे वजन किती असेल असे तुला वाटते? .....

चला करून पाहु

खालील वस्तूच्या वजनांचा अंदाज कर आणि अंदाज केलेल्या वजनाच्या रकान्यात (✓) अशी खुण कर. तु अंदाज केलेल्या वजनाची सत्यता वजन काटा वापरून तपास.


फळे आणि भाजी	अंदाज		खरे वजन	
	1 kg पेक्षा कमी	1 kg पेक्षा जास्त	1 kg पेक्षा कमी	1 kg पेक्षा जास्त
6 केळी				
5 बटाटे				
10 टोमॅटो				
15 कांदे				

@RTBS NOT TO BE REPUBLISHED

चला शोधूया.

a) खालील चित्र बघ तु त्याप्रमाणे करण्याचा प्रयत्न कर.

आम्ही किलोग्रॅमसाठी kg आणि ग्रॅमसाठी g असे सुध्दा लिहू




500 gms च्या 2 पिशव्या = 1000g=1kg
म्हणून 1 पिशवी म्हणजे 500g= $\frac{1}{2}$ kg किंवा
500g= $\frac{1}{2}$ kg







b) खालील चित्र बघ. तु त्याप्रमाणे करण्याचा प्रयत्न कर.



250 gms च्या 4 पिशव्या = 1000g = 1 kg.
म्हणून 1 पिशवीचे वजन 250g = $\frac{1}{4}$ kg किंवा
250 g = $\frac{1}{4}$kg










c) खालील चित्र बघ तु त्याप्रमाणे करण्याचा प्रयत्न कर.



100g च्या 10 पिशव्या
1000g = 1 kg









© KTBS NOT TO BE REPUBLISHED

चल शोधू या.


1. 500g डाळीच्या पिशवीच्या वजनाशी समान होण्यासाठी 250g डाळीच्या पिशव्या किती लागतील?

   खालील तराजूमधील रिकाम्या पारड्यात, 500g वजनाशी समान होण्यासाठी 250g च्या किती पिशव्या लागतील?

   तुला काय मिळाले?


   250 g = 500 g च्या .....

   पिशव्या ($\frac{1}{2}$,2)




2. तराजुचे पारडे ज्या दिशेने कलले आहे त्या दिशेने बाण दाखव. उदाहरणात दाखविलेले आहे.


a.




b.



c.




d.




@KEBS NOT TO BE REPUBLISHED

3. खालील वस्तू त्याच्या वजनाला योग्य असणाऱ्या मापाला बाणाने दाखव.




शिक्षकांसाठी सुचना : तुम्ही वर्गामध्ये 100g, 500g 1kg वजन मोजण्यासाठी वजन काटा उपलब्ध करून देऊ शकता. वरील कृती विद्यार्थ्यांना घरी किंवा शेजारी करून पाहण्यासाठी प्रोत्साहित करा.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला करूया

1 खोडरबर = 10g



1. 50g हळदीच्या पाकिटा इतके वजन होण्यासाठी किती खोडरबर घ्यावे लागतील ?.....

2. 100g वजनाच्या साबणाचे वजन ..... खोडरबराच्या वजना इतके असेल.

3. 250 ग्रॅम साखरेएवढे वजन ..... खोडरबराच्या वजना इतके असेल.

चला विचार करू

मिठाईचे डब्बे

श्री श्रीनाथन, एक मिठाई दुकानदार यांच्याकडे 1 किलो काजु कतलीसाठी अनेक ऑर्डर आहेत परंतू त्यांना ती अनेक आकाराच्या डब्यामध्ये भरून द्यायची आहे.



1 किलो काजू कतली भरण्यासाठी लागणाऱ्या डब्यांची संख्या खालील रिकाम्या जागी भरा.

1) श्री दास यांना प्रत्येकी 500 ग्रॅ. वजनाच्या डब्यामध्ये मिठाई हवी आहे. डब्यांची संख्या .....

2) श्रीमती फर्नांडीस याना प्रत्येकी 250 ग्रॅ. वजनाच्या डब्यामध्ये मिठाई हवी आहे. डब्यांची संख्या .....


3) श्रीमती खान याना प्रत्येकी 100 ग्रॅ. वजनाच्या डब्यामध्ये मिठाई हवी आहे. डब्यांची संख्या .....

4) श्री पटेल याना प्रत्येकी 50 ग्रॅ. वजनाच्या डब्यामध्ये मिठाई हवी आहे. डब्यांची संख्या .....

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

वजन काटा

वेगवेगळया वस्तुंचे वजन मोजण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या वजनकाट्याबद्दल तुम्हाला माहिती आहे का?



चला करूया

तुमच्या पालकांना विचारा आणि एका महिन्यात तुमच्या घरात खालील साहित्याचा किती प्रमाणात वापर होतो. ते शोधा.

साहित्य	वजन
पीठ	
तांदूळ	
मीठ	
साखर	

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वरूण व त्याची बहीण पीठ, तांदूळ व मिठ यांची पाकिटे वर उचलत आहेत.



त्यांना ही पाकिटे उचलताना काय जाणवत असेल? असे तुम्हाला वाटते.

तुम्ही कधी अशी पाकिटे तुमच्या घरी उचलली आहेत का? तुम्हाला काय जाणवले? चर्चा करा.

चला करू या

1) तुमच्या आजु बाजुला असलेल्या काही वस्तू उचलून पहा व तुम्ही सहज उचलू शकता अशा तीन वस्तूंची नावे खाली लिहा. त्यांच्या वजनाचा अंदाज करा.

1. ..... 2. ..... 3. .....

2) आता अशा वस्तुंची नावे लिहा, ज्या तुम्ही खूप प्रयत्न करून उचलू शकता. त्याच्या वजनाचा अंदाज लिहा.

1. ..... 2. ..... 3. .....

3) खालील वजनामध्ये 1 किलोची किती पाकिटे मिळतील ?

a. 10 किलोमध्ये : ..... c. 50 किलोमध्ये: .....

b. 20 किलोमध्ये : ..... d. 25 किलोमध्ये :.....

4. डाव्या स्तंभातील वस्तू उजव्या स्तंभातील त्याच्या अंदाजीत वजनाशी जुळवा.

मांजर 	1 ग्रॅ. ते 5 ग्रॅ.
हत्ती 	150 कि ग्रॅ ते 300 कि.ग्रॅ.
1लि.भरलेली बाटली 	3 कि. ग्रॅ. ते. 5 कि.ग्रॅ.
वाघ 	10 ग्रॅ. ते 15 ग्रॅ.
रिकामा गॅस सिलींडर 	6 कि. ग्रॅ. ते 10 कि. ग्रॅ.
पेन 	1000 कि. ग्रॅ. पेक्षा जास्त
पान 	15 कि. ग्रॅ.
लाकडी खुर्ची 	800 ग्रॅ. ते 1000 ग्रॅ.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुला माहित आहे का?

मिराबाई चानू या एक वेट लिफ्टर आहेत. त्यानी 2020 मध्ये टोकियो ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या 49 किलो वजनी गटात रौप्य पदक जिंकले. त्यांनी एकुण 202 किलो वजन उचलले.



क्षमता (आकारमान) मोजणे

तुम्हाला एक लिटरची बाटली आठवते का? तुमच्या पाण्याच्या बाटलीत किती पाणी मावते?

खालील प्रमाणात पाणी मावेल अशा बाटल्या किंवा डब्बे शोधा. खाली दिलेल्या तक्त्यात योग्य स्तंभात त्यांची नावे लिहा.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1 लि. पेक्षा कमी	1 लि.	1 लि. पेक्षा जास्त

वेगवेगळ्या क्षमतेच्या बाटल्या गोळा करण्यासाठी तुमचे शिक्षक आणि पालक यांच्याकडून मदत घ्या. – 500 मि.लि., 250 मि. लि., 100 मि. लि., 50 मि. लि., आणि 10 मि लि.


वेगवेगळ्या लहान बाटल्या वापरून एक लिटरची बाटली पाण्याने भरण्याचा प्रयत्न करा.

आपण सहसा लिटरसाठी *l* व मिली लिटरसाठी ml असे लिहीतो.

चला शोधू या

a) 1 लिटरची बाटली भरण्यासाठी किती 500 ml च्या बाटल्या लागतील ?





500 *ml* + 500 *ml* = 1 *l*
1000 *ml* = 1 *l*
500 *ml* = $\frac{1}{2}$ *l*

b) 1 लि.ची बाटली भरण्यासाठी 250 ml च्या किती बाटल्या लागतील ?



250 *ml* + 250 *ml* + 250 *ml* + 250 *ml* = 1 *l*
1000 *ml* = 1 *l*
250 *ml* = $\frac{1}{4}$ *l*

c) 1 लि. ची बाटली भरण्यासाठी 100 ml च्या किती बाटल्या लागतील ?



d) किती बाटल्या ?

$\frac{1}{2}$ *l* मध्ये 250 *ml* = ... 750 *l* मध्ये 250 *ml* = ...

$\frac{1}{2}$ *l* मध्ये 100 *ml* = ... 800 *ml* मध्ये 100 *ml* = ...

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला करूया.



1. 10*ml* चे डोसिंग कप किंवा बाटली घ्या आणि 100*ml* बाटली भरण्यासाठी 10*ml* किती लागतील शोधा.

किती ते शोधा.

a) 250 *ml* चा ग्लास भरण्यासाठी किती 10*ml* डोसिंग कप लागतील?

.....

b) 500 *ml* चे भांडे भरण्यासाठी किती 10*ml* डोसिंग कप लागतील?

.....

c) 1 *lt* ची बाटली भरण्यासाठी किती 10*ml* डोसिंग कप लागतील?

.....

2. 1*ml* ड्रॉपर घ्या आणि शोधा.




a) 10*ml* डोसिंग कप भरण्यासाठी 1*ml* ड्रॉपर किती लागतील?

b) एक चमचा भरण्यासाठी किती ड्रॉपर लागतील?

3. खालील द्रवपदार्थ एकावेळी किती प्रमाणात वापरले जातात.

a. डोळ्यांचे औषध	एकावेळी 1 *ml* पेक्षा कमी.
b. मध	.....
c. खोकल्याचे औषध	.....
d. स्वयंपाकातील तेल.	.....
e.	.....



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. कृष्णा यानी सुगंधी तेल वेगवेगळ्या आकाराच्या बाटल्यामध्ये भरलेले आहे. सणाच्या वेळी, खालील ग्राहकानी 1 लिटर सुंगधी तेल वेगवेगळ्या आकारांच्या बाटल्यामध्ये मागितले. त्या प्रत्येकाला किती बाटल्या मिळतील ते लिहा.

a) श्रीमती शेट्टी याना प्रत्येकी 500*ml* च्या बाटल्या हव्या आहेत .....

b) श्रीमती नैनी यांना प्रत्येकी 100*ml* च्या बाटल्या हव्या आहेत .....

c) श्री मुथूकुमार यांना प्रत्येकी 250*ml* च्या बाटल्या हव्या आहेत .....

d) श्रीमती कृष्णा याना प्रत्येकी 50*ml* च्या बाटल्या हव्या आहेत .....

5. अंदाज करा आणि मोजून पाडताळा. यासाठी तुम्ही गोळा केलेल्या बाटल्या वापरा. (उदाणार्थ 500*ml*, 250*ml*, 100*ml*, 50*ml*, 10*ml* इ.)

भांडे	अंदाज	प्रत्यक्ष क्षमता
पाण्याची बाटली		
ग्लास		
मग		
जग		
बादली		
चमचा		
वाटी		



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला शोधू

जवळच्या दूकानाला भेट द्या. आणि खालील प्रमाणात विकल्या जाणाऱ्या विविध वस्तूंची यादी करा.



50 *ml*	100 *ml*	200 *ml*	250 *ml*	500 *ml*	900 *ml*

चला शोधू

a. तुम्ही एका दिवसामध्ये किती लिटर पाणी पिता? तुम्ही ते कसे शोधला.



.....

b. कावळा एका वेळेला किती पाणी पिऊ शकत असेल?



.....

c. एका दिवसात तुम्ही किती दूध पिता?




.....

d. एका दिवसात हत्ती किती लिटर पाणी पितो?

.....

तुम्ही सर्वात जास्त पाणी कशासाठी वापरता? तुम्ही सर्वात कमी पाणी कशासाठी वापरता? तुमच्या वर्गातील इतर मुलांशी याची तुलना करा. कोणत्या कृतीमध्ये तुमचा पाणी वापर सारखा आहे?



खालील कृतीमध्ये किती पाणी वापरले जात असेल?

a. अंघोळ करण्यासाठी लागणारे पाणी

b. शेतात पिकाना लागणारे पाणी.



c. फुलाच्या झाडाना लागणारे पाणी.

d. कपडे धुण्यासाठी लागणारे पाणी.


e. .....

f. .....

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


क्षमता (आकारमान) मोजण्यासाठी वापरली जाणारी भांडी

दूध मोजण्यासाठी वापरले जाणारे हे मोजपात्र तुम्ही पाहिले आहे का ?



50 *ml* 100 *ml* 200 *ml* 500 *ml* 1000 *ml*

दैनंदिन जीवनात पाणी बचत



तुम्ही कधी नळातून किंवा पाणी शुद्धीकरण यंत्रातून पाण्याची छोटी धेंबाची गळती होताना पाहिली आहे का ?

प्रत्यक्षात किती पाणी वाया जात असेल याचा तुम्ही कधी विचार केला आहे का ?

गळती असलेल्या नळाखाली किंवा पाणी शुद्धीकरण यंत्राखाली एक भांडे एका तासासाठी ठेवा. अशा हळू गळतीतून एका तासात किती पाणी वाया जाते ? तुम्हाला याचे आश्चर्य वाटले असेल ना ?

- एका दिवसात किती पाणी वाया जाते ?
- तुमच्या मते एका आठवड्यात किती पाणी वाया जात असेल ?
- पाण्याचा हा अपव्यय आपल्यावर कसा परीणाम करेल ?



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण
9


समान गट




प्राण्यांच्या उड्या

योग्य संख्या वापरून रिकाम्या जागा भरा. प्राण्यांना त्यांच्या भक्षापर्यंत पोहोचण्यासाठी किती उड्या माराव्या लागतील ते शोधून काढा.

1. बेडूक एकावेळी 3 पायऱ्या उडी घेतो. तर बेडकाला किटक कोणत्या संख्येवर मिळेल? तो 67 वर पोहोचेल का?




2. खारूताई एकावेळी 4 पायऱ्या उडी घेते. तर ती कोणकोणत्या संख्यांवरती उडी घेईल? 60 वर पोहोचण्यासाठी खारुताईला कितीवेळा उडी मारावी लागेल?




© KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. ससा एकावेळी 6 पायऱ्या उडी घेतो.

तर ससा कोणकोणत्या संख्यांना स्पर्श करेल? ससा कोणत्या लहानात लहान तीन अंकी संख्येवर उडी घेईल? त्या संख्येवर पोहोचण्यास ससा किती उड्या घेईल?



4. कांगारू एकावेळी 8 पायऱ्या उडी मारतो. तर ते कोणकोणत्या संख्यांना स्पर्श करेल?



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ससा आणि कांगारू दोन्ही स्पर्श करतील अशा काही संख्या आहेत का?

5. 48 वर पोहोचण्यासाठी सशाला किती उड्या घ्याव्या लागतील?



त्याच संख्येवर पोहोचण्यासाठी कांगारूला किती उड्या घ्याव्या लागतील? .....

या ठिकाणी तूम्ही काय निरीक्षण केला? तुमचे विचार व्यक्त करा. .....

6. 60 वर पोहोचण्यासाठी बेडूक किती उडया मारेल ? .....

त्याच संख्येवर पोहोचण्यासाठी सशाला किती उड्या माराव्या लागतील ? .....

याठिकाणी तुम्ही काय निरीक्षण केला ? तुमचे विचार व्यक्त करा.

सामाईक गुणक

1. बेडूक आणि खारूताई, दोघांनीही स्पर्श केलेल्या संख्या कोणत्या ?

   3 आणि 4 यांचे काही सामाईक गुणक .....

2. ससा आणि कांगारू यांनी स्पर्श केलेल्या संख्या कोणत्या ?

   6 व 8 यांचे काही सामाईक गुणक .....

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

7. मांजर आणि उंदीर उड्या मारत एकाच संख्येवर पोहोचले तर मांजर उंदराला पकडेल.


   मांजर 6 वर आहे आणि उंदीर12 वर आहे.

   मांजर एकावेळी 3 पायऱ्या पुढे उडी मारते

   आणि उंदीर एकावेळी 2 पायऱ्या पुढे उडी मारतो.

   तर मांजर उंदराला पकडू शकेल का ? जर होय,

   तर कोणत्या संख्येवर पकडू शकेल ?



8. खालील संख्याचौकटीमध्ये गुणाकार व भागाकार दर्शविणारी विधाने शोधा. विधाने रेखांकित करा.

   तुम्ही अशी किती विधाने शोधाल ?

   दोन उदाहरणे तुमच्यासाठी दिलेली आहेत.

संख्या चौकट

3	4	2	7	4	9	8	2
4	2	10	20	5	2	2	4
12	8	0	6	4	8	8	1
3	2	6	2	2	6	16	2
2	3	6	18	6	5	3	1
10	3	4	1	12	2	7	14
2	0	2	2	6	10	7	2
20	5	8	2	2	5	10	2

गुलाबोची बाग

1. गुलाबोच्या बागेत लिलीची फुले आहेत. प्रत्येक फुलाला 3 पाकळ्या आहेत. तर 12 फुलांच्या मिळून एकूण किती पाकळ्या होतील? तुमचे उत्तर तुम्ही कसे शोधला ते सांगा.



गुलाबोकडे 12×3 पाकळ्या असतील.

10 फुलांच्या पाकळ्या 10×3 पाकळ्या = 30 पाकळ्या

2 फुलांच्या पाकळ्या = ...

12 फुलांच्या पाकळ्या = ...

गटांची संख्या (गुण्य)

12×3 = 36 (गुणाकार)

गटाचा आकार (गुणक)

गुणाकार विधान



2. जास्वंदीच्या फुलाला 5 पाकळ्या असतात. गुलाबोने सर्व पाकळ्या मोजल्या, त्या 80 होत्या. तर तिच्याकडे किती फुले होती?



गुलाबोकडे 80 ÷ 5 फुले होती.

एका फुलामध्ये 5 पाकळ्या होत्या.


दोन फुलांमध्ये 10 पाकळ्या होतील.

तसेच 10 फुलांमध्ये 50 पाकळ्या होतील.

तर ..... फुलांमध्ये 80 पाकळ्या होतील.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षकांसाठी सुचना: या प्रकरणात आपण एक अंकी, 2 अंकी आणि 3 अंकी संख्यांना एक अंकी संख्येने गुणाकार करणे याबाबत प्रामुख्याने चर्चा करणार आहोत. मुलांना गुणाकार सोपा करण्यासाठी गुण्य संख्येला 10 च्या गुणकांमध्ये रुपांतरित करून घेण्यासाठी प्रबलन द्या. त्यासाठी ते दुप्पट करणे आणि अर्धे करणे यासारख्या युक्त्या सुद्धा वापारू शकतात.



3. चित्रात दाखविल्याप्रमाणे गुलाबोने काही झेंडूची रोपं बॉक्समध्ये तयार केली.



येथे प्रत्येक आडव्या रांगेत ..... रोपं आहेत


तसेच प्रत्येक ऊभ्या रांगेत ..... रोपं आहेत

तर तिने एकूण किती रोपं तयार केली आहेत?

हे तुम्ही कसे काढाल?

गणिती विधान : .....

4. 'डेलीफ्रेश' या सुपरमार्केटमध्ये एका मोठ्या ट्रेमध्ये खालील प्रमाणे स्ट्रॉबेरीचे काही बॉक्स ठेवले आहेत. तर सुपर मार्केटमध्ये स्ट्रॉबेरीचे एकूण किती बॉक्स आहेत? ते तुम्ही कसे शोधून काढाल ते दाखवा



येथे स्ट्रॉबेरी बॉक्सचे उभे स्तंभ ..... आहेत.

तसेच बॉक्सच्य आव्या रांगा ..... आहेत.


तर तेथे स्ट्रॉबेरीचे ..... बॉक्स आहेत

गणिती विधान : .....

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. राधा एक बेकरी चालविते. तीने खालील चित्रात दाखविल्याप्रमाणे 18 कपकेक एक ट्रेमध्ये बनविले.


a) खाली दिलेल्या दोन ट्रे मध्ये कपकेक मांडणी पूर्ण करा.



b) ती तीच्या ओव्हनमध्ये एकावेळी असे दोन ट्रे ठेऊ शकते. तर ती एकावेळी किती कपकेक बनवू शकते?

c) आज तिच्याकडे केकची एक विशेष मागणी आली आहे. त्यासाठी तिने 108 कपकेक बनविलेले आहेत. तर तिने किती ट्रे बेकिंग केलेले आहेत ?

d) तिच्याकडे आणखी एक चौरसाकार बेकिंग ट्रे आहे. त्यामध्ये ती छोटे छोटे 36 कपकेक एकावेळी बनवू शकते. खालील चित्रात केकची मांडणी पूर्ण करा.



ऊभ्या स्तंभांची संख्या .....

प्रत्येक स्तंभातील केकची संख्या .....

गुणाकाराचे विधान .....

खालील संख्यांइतके कपकेक मांडणी करण्यासाठी विविध मार्ग सुचवा. तुमच्या वहीत रांगा आणि स्तंभांची मांडणी वेगवेगळ्या पद्धतीने दाखवा.

36, 8, 12 आणि 24

दुप्पट करावयाची जादू

एक दिवस जादूगार अन्वी

गुलाबोच्या घरी आली, जादूच्या खेळासाठी तयार झाली.

तिच्या कोटातून तीने गुच्छ काढले,

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षकांसाठी सुचना: विविध प्रकारे उत्तरे शोधण्यासाठी मुलांना प्रेरीत करा. विद्यार्थी एकूण मोजणी थांबवून, आडव्या ओळी आणि उभ्या स्तंभातील संख्येवरून समान गटांचा विचार करू शकतील. विद्यार्थ्यांनी गुणाकाराच्या विधान मांडणीकडे लक्ष द्यावे यासाठी ही युक्ती आहे.



तीने ताजी आणि टवटवीत अशी 23 फुले बाहेर काढली.



ती हसली आणि म्हणाली, ''आता पहा येथे किती फुले झाली?





अन्वीने काय जादू केली?

आता येथे किती फुले आहेत? .....

जादूपूर्वीची फुले	23	10	51	95	150	199	425	500			
जादूनंतरची फुले	46								222	410	500

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

a) 32 ची दुप्पट = ... b) 14 ची दुप्पट = ...

c) 26 ची दुप्पट = ... d) 17 ची दुप्पट = ...

e) 39 ची दुप्पट = ... f) 45 ची दुप्पट = ...

1) खालील संख्यांची दुप्पट केल्यास एकक स्थानी येणारा अंक ओळखा. खाली दिलेल्या मोकळ्या जागेत एकक स्थानी येणारा अंक लिहा.

a) 28- ..... b) 56- ..... c) 45- ..... d) 17- .....

2) खाली दिलेले अंक दुप्पट केलेल्या संख्येच्या एकक स्थानी येतील अशा संख्यांची उदाहरणे द्या.

a) 0 ..... b) 2 .....

c) 4 ..... d) 6 .....

e) 8 .....


दुप्पट केल्यानंतर 3, 5, 7, 9 हे त्या संख्येच्या एककस्थानी येतील का?

तर मग या ठिकाणी तुमच्या काय लक्षात आले, दुप्पट केल्यानंतर येणाऱ्या संख्या कशा आहेत? सम की विषम?

शिक्षकांसाठी सुचना: मोठ्या संख्यांच्या बाबतीत मुलांना दुप्पट आणि अर्धे करताना डाईन ब्लॉक किंवा गणित माला वापरण्यास प्रेरित करावे. दुप्पट करणे व अर्धे करणे या दोन्ही युक्त्या गुणाकार व भागाकार शिकविताना वापरण्यास अत्यंत उपयूक्त आहेत. शिक्षक दुप्पट केलेल्या संख्येत एकक स्थानी वेगवेगळे अंक येतील असे बदल योजनाबध्द करतील.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील तक्त्यामधील आडव्या ओळींची संख्या आणि ऊभ्या स्तंभांची संख्या यांचा गुणाकार करून रिकाम्या चौकटीमध्ये भरा.



हिरव्या रंगाने रंगवलेल्या चौकटीमधील संख्यांबद्दल तुम्हाला काय वाटते ?

त्या संख्या तशा का आल्या ?

1) वरील तक्त्यामध्ये तुम्ही नोंद केलेले पदबंध वर्गात सादर करा.

2) 7 व्या आडव्या ओळीतील संख्या ह्या 7 व्या ऊभ्या स्तंभातील संख्याशी तंतोतंत मिळत्या जुळत्या आहेत का ? अर्थात, सामान्यपणे दिलेल्या आडव्या ओळीतील संख्या ह्या ऊभ्या संगत स्तंभातील संख्यांशी तंतोतंत मिळत्या जुळत्या असतात का ? असे का घडते ?

3) सर्व उत्तरे (गुणाकार) सम संख्या असलेली एखादी आडवी ओळ वरील तक्त्यात आहे का ? कोणकोणत्या ओळीत हा गुणधर्म दिसून येतो ?

4) सर्व उत्तरे (गुणाकार) विषम संख्या असलेली एखादी आडवी ओळ वरील तक्त्यात आहे का ? कोणकोणत्या ओळीत हा गुणधर्म दिसून येतो ?

5) सर्व संख्या सम आणि विषम संख्या असलेली एखादी आडवी ओळ वरील तक्त्यात आहे का ? त्याची नोंद तुम्ही घेतला का ? असे का होते ?

6) वरील तक्त्यात जास्तीत जास्त सम संख्या आहेत की विषम संख्या आहेत ? हे तुम्हाला कसे समजते ?

7) खालील संख्यांचे सामाईक गुणक शोधा. ते वेगवेगळ्या रंगांनी रंगवा.

a) 2 आणि 3 b) 4 आणि 8 c) 7 आणि 9

या प्रत्येक बाबतीत येणाऱ्या सामाईक गुणकाबद्दल निरीक्षण करून तुमचे स्वताचे विचार व्यक्त करा.

8) 5 व्या ओळीमधील गुणाकारांच्या एकक स्थानी आलेल्या अंकाच्या पदबंधाचे अवलोकन करा. तसेच इतर ओळींमधील गुणाकाराच्या एकक स्थानी आलेल्या अंकांचेही अवलोकन करा. कोणते पदबंध तुम्हाला दिसून आले ?

9) या ठिकाणी तक्त्यामधील 8 ची आडवी ओळ दिलेली आहे. तिचे अवलोकन करा. 8, 16, 24, 32, 40, 48, 56, 64, 72, 80 यामधील प्रत्येक संख्येच्या एकक स्थानी

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आलेला अंक पहा: 8, 6, 4, 2, 0, 8, 6, 4, 2, 0. यामध्ये पूनरावर्तीत पदबंध तुम्हाला दिसून आला का?

खालील गुणाकारांच्या एककस्थानी येणारा अंक ओळखा. खालील गुणाकार सोडवून तुमचे उत्तर पडताळा. दिलेल्या रिकाम्या जागेत तो अंक लिहा.

11×8 ..... 12×8 ..... 13×8 .....

10) तक्त्यामधील 8 व्या ओळीमध्ये एकक स्थानी 1 असणारी एकही संख्या नाही. कोणतेही दुसरे अंक एकक स्थानी आलेले का दिसत नाहीत?

11) एकक स्थानी 0 ते 9 पर्यंतचे सर्व अंक असलेली एखादी आडवी ओळ तक्त्यामध्ये दिसून येते का? कोणत्या ओळीत हा गुणधर्म दिसून येतो?

12) 8 व्या ओळीमध्ये एकक स्थानी 0 हा अंक दोनवेळा आलेला दिसून येतो.

☐ x 8 = यामध्ये एकक स्थानी 0 दिसून येतो.

रिकाम्या चौकटीत येणाऱ्या संख्या कोणत्या? अशा संख्यांची 5 उदाहरणे द्या.

13) 0 एकक स्थानी केवळ एकदाच आलेली एखादी ओळ तक्त्यात सापडते का? कोणत्या ओळीत हा गुणधर्म दिसून येतो?

14) प्रश्न 11 वा व 13 वा यांच्या उत्तराबाबत तुम्ही काही नोंद घेतली का? तुमच्या काय लक्षात आले ते वर्गात व्यक्त करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

दहाचे गुणक

1) आता आपण खालील चित्रातील सायकलींची चाके मोजूया.



प्रत्येकी 3 चाके असलेल्या 10 सायकलींची एकूण चाके 10 × 3= ..... चाके इतकी होतील.

प्रत्येकी 3 चाके असलेल्या आणखी 10 सायकलींची एकूण चाके 10 × 3= ..... चाके होतील.

अर्थातच प्रत्येकी 3 चाके असलेल्या 20 सायकलींच्या एकूण चांकांची संख्या

=20 × 3 = ... + ... = ... चाके इतकी होतील.

2) आता आपण कारगाड्यांच्या चाकांची मोजणी करूया.

10 × 3 = ...
20 × 3= .....



प्रत्येकी 4 चाके असलेल्या 10 कारच्या एकूण चाकांची संख्या

10 × 4= ..... चाके होईल.

प्रत्येकी 4 चाके असलेल्या 30 कारच्या एकूण चाकांची संख्या

30 × 4 = ... + ... +..... = ... चाके होतील.

10 × 4 = _____
30 × 4 = _____

गटांची संख्या 10 च्या पटीत असेल तर काय होईल?

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

खालील उदाहरणे याच प्रकारे सोडवा. तुम्ही उत्तर कसे शोधता ते वर्गात व्यक्त करा.

a) 10 × 6 = ...
b) 40 × 6 = ...

c) 10 × 8 = ...
d) 60 × 8 = ...


e) 6 × 8 = ...
f) 60 × 8 = ...

g) 4 × 6 = ...
h) 40 × 8= .....

शिक्षकांसाठी सुचना: वरील उदाहरणांमध्ये मिळालेल्या गुणाकारांमधील सामान्य नियम ओळखण्यासाठी मुलांना प्रेरीत करा. 6×8 आणि 60×8 यामधील सहसंबंध सुस्पष्ट करण्यासाठी दहा-वेळा 'हा एक चांगला मार्ग आहे. त्याचप्रमाणे 10×4 आणि 30×4 यामधील सहसंबंध सुस्पष्ट करण्यासाठी 'चार-वेळा' हा विचार करणे एक उत्तम मार्ग आहे.


10 ने गुणाकार करणे

1) राधा प्रत्येकी 4 प्रमाणे कपकेक बॉक्समध्ये भरते आहे. तीने असे 18 बॉक्स भरून तयार केले आहेत. तर तीने बॉक्समध्ये भरलेले एकूण कपकेक किती?



18 बॉक्समध्ये प्रत्येकी 4 कपकेक आहेत. म्हणून एकूण कपकेकची संख्या 18×4 होईल.

10 बॉक्समध्ये प्रत्येकी 4 कपकेकप्रमाणे कपकेकची एकूण संख्या 10×4 कपकेक =..... कपकेक होईल.




8 बॉक्समध्ये प्रत्येकी 4 कपकेकप्रमाणे कपकेकची एकूण संख्या 8×4 कपकेक=..... कपकेक होईल.


18 बॉक्समध्ये प्रत्येकी 4 कपकेकप्रमाणे कपकेकची एकूण संख्या..... +..... कपकेक होईल =..... कपकेक.



×	4
10	10 × 4 = 40
8	8 × 4 = 32
	72

2) एक बैलगाडी बनविण्यासाठी 8 बांबूच्या काठ्यांची आवश्यकता आहे. तर 23 बैलगाड्या तयार करण्यासाठी किती काठ्या लागतील?





© KTBS NOT TO BE REPUBLISHED

एका बैलगाडीसाठी 8 बांबूच्या काठ्या लागतील. तर 23 बैलगाड्यांसाठी 23×8 काठ्या लागतील.

20 गाड्यांसाठी प्रत्येकी 8 प्रमाणे एकूण

20×8 काठ्या = ... काठ्या लागतील.

3 गाड्यांसाठी प्रत्येकी 8 प्रमाणे एकूण


3×8 काठ्या =..... काठ्या लागतील.

×	8
20	20 × 8 = 160
3	3 × 8 = 24
	184

चला आणखी काही उदाहरणे सोडवू



1) 25 हंस आणि 12 मेंढ्यांचा एकेक कळप तलावाच्या परीसरात जमला आहे. चिप्पी या सरडयाने तीथे भरपूर पाय असलेले पाहिले. तर सरड्□याने किती पाय पाहिले असतील?



2) एका सभागृहात प्रत्येक रांगेत 8 मुले बसलेली आहेत. त्या सभागृहात एकूण 15 रांगा आहेत. तर सभागृहात एकूण किती मुले बसलेली आहेत?

3) एका पुस्तकांच्या दुकानात एका कोषात 9 पुस्तके ठेवलेली आहेत. तेथे असे 14 कोष आहेत. तर दुकानातील एकूण पुस्तकांची संख्या किती?

4) सुर्या चित्रात दाखविल्या प्रमाणे दोन वेगवेगळ्या रंगांचे चौरसाकार तुकडे वापरून एक डिझाईन तयार करत आहे. तर त्याने यासाठी एकूण किती चौरसाकार तुकडे वापरले आहेत? त्यामधील सोनेरी रंगाचे तुकडे किती व पांढऱ्या रंगाचे तुकडे किती?



5) खालील प्रत्येक उदाहरणासाठी वरीलप्रमाणे एक शाब्दिक समस्या तुमच्या शब्दात लिहा. त्यानंतर त्यांचा गुणाकार शोधून काढा.

a) 34 × 3 b) 75 × 5 c) 46 × 6 d) 50 × 9

NOT TO BE REPUBLISHED @KBS

भागाकार

1) छोट्या तिचाकी टेंपोंसाठी एका कंपनीने 58 चाके मागविलेली आहेत.

प्रत्येक टेंपोला 3 चाके लागतात.

तर ते किती गाड्यांना ही चाके बसवू शकतील ?

प्रत्येक पायरीनुसार तुमचे विचार मांडा व चर्चा करा.


टेंपोंची संख्या 58 ÷ 3 इतकी होईल.

10 टेंपोंसाठी 30 चाके लागतात. आता ..... चाके शिल्लक राहिली.

.....टेंपोंसाठी 15 चाके लागतील. आता ..... चाके शिल्लक राहिली.

..... टेंपोंसाठी 1 चाके लागतील. आता. चाके शिल्लक राहिली.

म्हणून एकूण.....टेंपोंसाठी..... चाके बसवावी लागतील आणि ..... चाके शिल्लक राहतील.



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आपण आणखी एक टेंपो तयार करू शकतो का ?

कंपनी 58 चाके वापरून एकूण किती टेंपो तयार करू शकेल ? .....

```
3) 58 ( 10+5+3+1
  -30
   28
  -15
   13
  - 9
    4
  - 3
    1
```

58 चाकांचा वापर करून आपण 19 टेंपो तयार करू शकतो आणि 1 चाक शिल्लक राहील.

शिक्षकांसाठी सुचना: भागशः भागाकार पध्दतीने याठिकाणी भागाकार केलेला आहे. या ठिकाणी 10, 5 व आणखी इतर लहान गटांची वजाबाकी करत भागाकार केलेला आहे. समस्या सोडविण्यासाठी मुले आपल्या निवडीनुसार गुणक वापरून भागाकार करू शकतात. त्यांना टप्याटप्याने 10 च्या गुणकांच्या स्वरूपात भाग देण्यास प्रेरीत करा.

2) एका गोशाळेत भरपूर गायी होत्या. चिप्पी या सरड्याने 88 पाय पाहिले आणि तो चकित झाला.



त्या गोशाळेत किती गायी होत्या? तुमचे विचार स्पष्ट करण्यासाठी योग्य गणिती विधानात त्यांची मांडणी करा.

गायींच्या एकूण पायांची संख्या: .....

गायींची एकूण संख्या 88 ÷ ..... होईल.

खालील कोष्टकात तुम्ही केलेले वैधानिक कार्य लिहा.

टीप: 10 चे गट बाजूला घेऊन करणे सोपे जाईल.

पायांची संख्या	गाईची संख्या	शिल्लक पायांची संख्या
		88
40	10	48
_____	_____	_____
_____	_____	_____


4) 88 (10+
– 40
48
–

गायींची एकूण संख्या = ...

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला सोडवू

1) एका मोठ्या मत्स्यपेटीत जॉलीमाशाने ऑक्टोपसचे एकूण 72 पाय पाहिले. तर मत्स्यपेटीत किती ऑक्टोपस असतील?



2) एका स्पोर्टस् स्टोअर मध्ये एका बॉक्समध्ये 4 शटल कॉक भरले आहेत. त्यांच्याकडे एकूण 50 शटलकॉक असतील तर ते प्रत्येकी 4 प्रमाणे त्यांना किती बॉक्स लागतील. ते सगळे शटलकॉक बॉक्समध्ये भरू शकतील का? बाकी किती उरतील

3) येत्या उत्सवांसाठी रमाकाकूने आपल्या शेताच्या काही भागात फुलझाडे लावली आहेत. तीने 75 गुलाबाची रोपं लावली आहेत. एका रांगेत 5 रोपं लावली असतील तर एकूण किती रांगांमध्ये तीने रोपं लावली आहेत?

4) खालील प्रत्येक उदाहरणासाठी शाब्दिक समस्या तुमच्या शब्दात लिहा. आणि सोडवा.

a) 70 ÷ 5


b) 84 ÷ 7

c) 69 ÷ 3

d) 93 ÷ 6

100 चे गुणक

प्रत्येक गाडीवर 2 माणसे



100 गाड्यांवर प्रत्येकी 2 माणसे याप्रमाणे बसले तर एकूण लोक 100 × 2 = ... माणसे होतील.

200 गाड्यांवर प्रत्येकी 2 जण बसले तर एकूण लोक ..... होतील.


हे तुम्ही कसे शोधून काढले?

100 कारगाडयांमध्ये प्रत्येकी 4 जण बसले असतील तर एकूण लोक 100 × 4=..... माणसे होतील.

500 कारगाड्यांमध्ये प्रत्येकी 4 जण बसले तर एकूण ..... लोक होतील.

हे तुम्ही कसे शोधून काढले ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



प्रत्येक कारगाडीत 4 जण आहेत

500 × 4 = _____
100 × 4 = _____

5 × 4 = _____
50 × 4 = _____

100 च्या गुणकाने गुणाकार करताना तुम्ही काय अवलोकन केले?

शिक्षकांसाठी सुचना: विविध पध्दतीने उत्तरे शोधून काढण्यास मुलांना प्रेरीत करा. त्याचप्रमाणे एक अंकी गुणाकार आणि त्याच गटातील 100 च्या गुणकाचा गुणाकार यामधील सहसंबंध ओळखण्यास सहाय्य करा. सहसंबंध सांगताना '100 वेळा' असा शब्दप्रयोग करणे योग्य होईल.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

खालील उदाहरणामधील पदबंधांचे अवलोकन करा उत्तरे लिहा.

1 × 3 =	2 × 3 =	4 × 3 =
10 × 3 =	20 × 3 =	40 × 3 =
100 × 3 =	200 × 3 =	400 × 3 =

2 × 4 =	4 × 2 =	8 × 1 =
20 × 4 =	40 × 2 =	80 × 1=
200 × 4 =	400 × 2 =	800 × 1 =

3 × 4 =	3 × 5 =	3 × 9 =
30 × 4 =	30 × 5 =	30 × 9 =
300 × 4 =	300 × 5 =	300 × 9 =

अधिक सरावासाठी गुणाकार

1. भारताच्या छोट्या शहरांमधून मोठे मोठे इलेक्ट्रीक ऑटोरीक्षा एकावेळी 8 प्रवासी घेऊन चालतात.



अशा 125 रीक्षामधून एकावेळी एका फेरीत किती प्रवासी प्रवास करत असावेत?

8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8

प्रत्येकी 8 प्रवासी असलेले 100 ऑटोरीक्षा

8	8	8	8	8	8	8	8	8	8
8	8	8	8	8	8	8	8	8	8

प्रत्येकी 8 प्रवासी असलेले 20 ऑटोरीक्षा

8	8	8	8	8

प्रत्येकी 8 प्रवासी असलेले 5 ऑटोरीक्षा

NOT TO BE REPUBLISHED © BSCERT

प्रवाशांची एकूण संख्या 125 × 8.

प्रत्येकी 8 प्रवासी असलेले 100 ऑटोरीक्षामधील एकूण प्रवासी 100 ÷ 8 = ... प्रवासी होतील.

प्रत्येकी 8 प्रवासी असलेल्या 20 ऑटोरीक्षामधील एकूण प्रवासी 20 ÷ 8 = ... प्रवासी होतील.

प्रत्येकी 8 प्रवासी असलेल्या 5 ऑटोरीक्षामधील एकूण प्रवासी 5 ÷ 8= ..... प्रवासी होतील.

×	8
100	100 × 8 = 800
20	20 × 8 = 160
5	5 × 8 = 40
	1000

म्हणून प्रत्येकी 8 प्रवासी असलेल्या 125 ऑटोरीक्षामधील एकूण प्रवाशांची संख्या =.....+.....+..... = ... प्रवासी होईल.

2) केतन आणि राबीया हे कुंभार आहेत आणि त्यांनी रेल्वेगाडीत चहा देण्यासाठी मातीचे कप (कुल्हड) बनविले आहेत.



त्यांनी प्रत्येक बॉक्समध्ये 6 कुल्हड याप्रमाणे 174 बॉक्स पाठविण्यासाठी तयार केलेले आहेत. तर त्यांनी एकूण किती कुल्हड तयार केले असतील कुल्हडची एकूण संख्या .....

प्रत्येकी 6 कुल्हड असलेले 100 बॉक्स

प्रत्येकी 6 कुल्हड असलेले 70 बॉक्स

प्रत्येकी 6 कुल्हड असलेले 4 बॉक्स

174

×	6
100	100 × 6 = ____
70	70 × 6 = ____
4	4 ×6 = ____

@YTBS NOT TO BE REPUBLISHED

चला सोडवू

1) मुलींच्या BP विद्यालयाने पहिल्या दिवशी मुलींना 2 पेन्सील देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्या शाळेत 465 विद्यार्थीनी आहेत. तर शाळाप्रशासनाला किती पेन्सील खरेदी कराव्या लागतील ?

2) एका शाळेतील 234 विद्यार्थ्यांनी 'शालेय-पर्व' आयोजित करण्याचे ठरविले आहे. या शालेय-पर्वाच्या आयोजनासाठी विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ₹ 5 वर्गणी जमा केली आहे. तर त्यांनी एकूण किती वर्गणी जमविली आहे ?

3) खालील उदाहरणासाठी तुम्ही शाब्दिक समस्यांची रचना करा आणि त्या सोडवा.

a) 439×4 b) 514×8

c) 356×5 d) 623×7

अधिक सरावासाठी भागाकार

कावेरी नदीच्या तीरावर वाट पाहत असलेल्या 108 प्रवाशांना नदीपार नेण्यासाठी 9 होड्या सज्ज आहेत. प्रत्येक होडीतून जाणाऱ्या प्रवाशांची संख्या समान असल्यास प्रत्येक होडीमध्ये किती प्रवासी बसतील?

9 होड्यांमधून 108 प्रवाशांना नदीपार न्यायचे आहे. प्रत्येक होडीत बसविता येणाऱ्या प्रवाशांची संख्या $108 \div 9$ होईल.

जर प्रत्येक होडीत 5 प्रवासी बसले, तर 9 होड्यांमधून 45 प्रवासी नदीपार जाऊ शकतील.

जर प्रत्येक होडीत आणखी 5 प्रवासी बसविले (एकूण 10) तर 9 होड्यांमधून 90 प्रवासी जाऊ शकतील.

तेव्हा उरलेल्या 18 प्रवाशांना 9 होड्यांमधे बसवावे लागेल. त्यामुळे प्रत्येक होडीत आणखी दोन प्रवाशांना बसवावे लागेल.

म्हणून 9 होड्यांमध्ये प्रत्येकी 12 प्रवाशांना बसवावे लागेल.

$$
\begin{array}{r|l}
9 & 108 \\
 & -45 \\
\hline
 & 63 \\
 & -45 \\
\hline
 & 18 \\
 & -18 \\
\hline
 & 0
\end{array}
\quad 5+5+2
$$

शिक्षकांसाठी सूचना : भागाकाराच्या समस्या दोन प्रकारच्या असतात. समान वाटणी आणि मोजणी. समान वाटणी प्रकारामध्ये समान गटांची संख्या दिलेली असते जी वस्तूंची समान वाटणी करण्यासाठी सुचीत करते. (म्हणजेच गुणक). वरील उदाहरण हे 'समान वाटणी' या प्रकारचे आहे. मोजणी या प्रकारात गटाची व्याप्ती दिलेली असते (म्हणजेच गुण्य), म्हणजे आपण असे विचारू की, पायांची संख्या जर 60 असेल तर एकूण किती मुंग्या असतील. या दोन्ही प्रकारच्या समस्या मुलांसाठी फायदेशीर आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

भागाकारामधील पदबंध

प्रत्येकाला किती पैसे मिळतील? याचे उत्तर शोधण्यासाठी नोटा आणि मुले बाणांनी जोडून दर्शवा.



1. 3 मुलांना ₹ 30 समान वाटल्यास प्रत्येकी .....
2. 3 मुलांना ₹ 900 समान वाटल्यास प्रत्येकी .....





वरील विचारसरणीचा उपयोग करून खालील उदाहरणे सोडवा. खालील उदाहरणांमध्ये असलेल्या पदबंधांचे अवलोकन करून स्पष्टीकरण करा.

A	B	C
3 ÷ 3 = _____	9 ÷ 3 = _____	15 ÷ 3 = _____
30 ÷ 3 = _____	90 ÷ 3 = _____	150 ÷ 3 = _____
300 ÷ 3 = _____	900 ÷ 3 = _____	300 ÷ 3 = _____
5 ÷ 5 = _____	8 ÷ 4 = _____	4 ÷ 2 = _____
50 ÷ 5 = _____	80 ÷ 4 = _____	20 ÷ 2 = _____
500 ÷ 5 = _____	800 ÷ 4 = _____	100 ÷ 2 = _____

@YTBS NOT TO BE REPUBLISHED

1. वाहतुकीच्या एका ट्रकला 6 टायर असतात. चिप्पी सरड्याने रस्त्यावर 60 टायर पाहीले. तर रस्त्यावर किती ट्रक होते ?
2. चिप्पीने एका वाहनतळावर 80 चाके पाहिली तर त्या वाहनतळावर किती कार उभ्या आहेत?
3. चिप्पीने एका वारूळाच्या सभोवार मुंग्यांचे 600 पाय पाहिले. तर त्या ठिकाणी किती मुंग्या असतील?
4. एका दुकानात काही पाकीटांमध्ये 800 रबर बँड भरलेले आहेत. प्रत्येक पाकीटामध्ये 4 रबरबँड असतील तर दुकानामध्ये रबरबँडची किती पाकीटे असतील?

चला सोडवू

1) एका शाळेने वाहतूक संग्रहालयाला भेट देण्यासाठी 245 मुलांसाठी 7 बस भाड्याने घेतल्या. प्रत्येक बसमध्ये बसविलेल्या मुलांची संख्या समान आहे. तर प्रत्येक बसमधून प्रवास करणाऱ्या मुलांची संख्या किती ?

2) दार्जीलिंगच्या हिमालयीन रेल्वेगाडीला गमतीने 'टॉय ट्रेन' असे म्हणतात. ह्या टॉय ट्रेनचा प्रवास युनेस्को (UNESCO) चा जागतिक वारसा म्हणून गणला जातो.

ही अद्‌भूत रेल्वेगाडी न्यू जलपाईगुडी आणि दार्जीलिंग या शहरादरम्यान धावते आणि जगातील सर्वोच्च स्थानकांपैकी एक असलेल्या 'धूम' या स्थानकावरून जाते. ती दररोज 88 कि.मी. धावते. तर एका आठवड्यात त्या गाडीने आक्रमिलेले अंतर किती ?

3) गंगानदीमध्ये शिवपूरीपासून ऋषीकेशपर्यंत 16 कि.मी. च्या अंतरात राफ्टींगचा अत्यंत रोमांचक अनुभव घेण्याची संधी मिळते. उन्हाळ्याच्या दिवसामध्ये व्हेंचर आऊट कंपनी 259 जणांना राफ्टींगसाठी तेथे घेऊन जाते. प्रत्येक राफ्टमध्ये 7 लोक राफ्टींगकरू शकतात. तर त्यासाठी किती राफ्ट करावे लागतील ?

4) अनू आपल्या पिगी-बँकमध्ये दर महिन्याला ₹45 जमविते.

a) 6 महिन्यात अनूने जमा केलेली रक्कम किती होईल ?

b) 6 महिन्यात जमविलेले सर्व पैसे ती आपल्या 6 मित्रांना समान वाटते. तर प्रत्येक मित्राला मिळणारी रक्कम किती ?

c) 6 महिन्यात जमविलेले सर्व पैसे जर तीने 3 मित्रांना समान वाटायचे ठरविले तर प्रत्येकाला मिळणारी रक्कम किती ?

5) राजू एक रीक्षाचालक आहे आणि तो लोकांना दररोज बसस्थानकापर्यंत घेऊन जातो. तो दिवसभरात 8 वेळा लोकांची ने आण करतो. या माहितीवरून खालीलपैकी कोणती समस्या सोडविता येईल ते ओळखा व ती सोडवा.

a) तो दिवसभरात किती पैसे कमवितो ?

b) 7 दिवसात त्याच्या किती फेऱ्या होतील ?

शिक्षकांसाठी सुचना: विद्यार्थ्यांना भाज्य, भाजक, भागाकार आणि बाकी यामधील सहसंबंध समजून घेण्यास प्रेरीत करा. भाज्य 5 पट / 10 पटीने बदलल्यास भागाकारामधील बदल कसे होतील ते समजून घेण्यास सहाय्य करा. तसेच गुणाकार व भागाकारामधील सहसंबंध समजून घेण्यासही प्रेरीत करा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

c) एका फेरीसाठी किती वेळ लागेल ?

d) 4 आठवड्यात त्याच्या किती फेऱ्या होतील ?

6) सोडवा

a) 45×9 b) 507×7 c) $94 \div 4$

d) $778 \div 6$ e) 94×5 f) 396×4

g) $83 \div 3$ h) $635 \div 5$

7) गणितामध्ये काही विधाने नेहमी सत्य असतात. काही विधाने विशिष्ट वेळेला सत्य असतात तर काही विधाने असत्य असतात. खालील कोष्टकामध्ये योग्य त्या स्तंभात(✓) अशी खूण करा.

अ. क्र.	विधाने	नेहमी सत्य	नेहमी असत्य	काहीवेळा सत्य
a)	दहा (10) ने गुणाकार केल्यास उत्तराच्या एकक स्थानी नेहमी 0 येतो.			
b)	2 ने गुणाकार केल्यास उत्तर एक विषम संख्या येते.			
c)	5 ने गुणाकार केल्यास उत्तराच्या एकक स्थानी 5 ही संख्या येते.			
d)	कोणत्याही विषम संख्येनंतर क्रमाने येणारी पुढील संख्या समसंख्या असते.			
e)	कोणत्याही संख्येचे अर्धे (समान दोन भाग) केल्यास येणारी संख्या सम असते.			
f)	कोणत्याही संख्येत 0 मिळविल्यास ती संख्या 1 ने वाढते.			

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षकांसाठी सुचना: वेगवेगळ्या परिस्थितीत गणितीय विधानांची सत्यता किंवा वैधता समजून घेऊन ती पडताळून पाहण्यासाठी ''नेहमी सत्य, नेहमी असत्य आणि काहीवेळा सत्य'' या प्रकारच्या प्रश्नांची रचना केली गेली आहे. असे प्रश्न तार्किक चिंतन, संकल्पनांचे अवलोकन आणि कारण मिमांसा यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरीत करत असतात. पारंपारिक पाठांतर पध्दतीच्या पलीकडे जाऊन गणिती तत्त्वांचे संपूर्ण आकलन करण्यासाठी असे प्रश्न सहाय्यभूत ठरतात.

प्रकरण 10

हत्ती, वाघ आणि चित्ते

C3Y8D2



आधी कोण? (२ खेळाडूंचा खेळ)

इयत्ता तिसरीमध्ये असताना तुम्ही याप्रकारचा एक खेळ या प्रकरणामध्ये खेळला आहात.

10 या लक्ष्यावर पोहोचण्यासाठी तुम्हाला 1 किंवा 2 हे दोनच अंक प्रत्येक वेळी मिळविण्याची मुभा आहे.

कसे खेळाल?

1. पहिला खेळाडू 1 किंवा 2 ची नीवड करून ह्या खेळाला सुरुवात करेल.
2. दुसरा खेळाडू 1 किंवा 2 ची नीवड करून तक्त्यात मांडणी करेल आणि पहिल्या खेळाडूने मांडलेल्या अंकाची व स्वताच्या अंकाची बेरीज करून एकूण स्तंभात मांडेल.



3. या प्रमाणे दोघे खेळाडू 1 किंवा 2 यापैकी एक अंक प्रत्येकवेळेस निवडून आधीच्या बेरजेत तो अंक मिळवून पुन्हा एकूण बेरीज लिहिल.
4. जो खेळाडू आधी 10 या लक्ष्यावर पोहोचेल तो या खेळाचा विजेता असेल.
5. काही फेऱ्यांमध्ये हा खेळ खेळा.

प्रत्येक वेळेस कोण जिंकेल ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


तुम्ही हा खेळ केव्हा जिंकू शकाल ? जर

a) दुसरा खेळाडू 6 या एकूण संख्येवर येऊन पोहोचला आणि त्यानंतर तुमचा डाव आला तर ?

b) दुसरा खेळाडू 7 वर पोहोचला आणि त्यानंतर तुमचा डाव आला तर ?

c) दुसरा खेळाडू 8 वर पोहोचला आणि त्यानंतर तुमचा डाव आला तर ?

शिक्षकांसाठी सुचना: वेगवेगळ्या लक्ष्य संख्या घेऊन हा खेळ खेळावयास मुलांना प्रोत्साहन द्या. खेळामधील बेरजा आणि परिणाम तुम्ही सुद्धा नोंद करून ठेऊ शकता. ते मुलांना विश्लेषण करावयास सहाय्यभूत होईल.



10, 11 किंवा 12 अशा अन्य लक्ष्य संख्या घेऊन हा खेळ 1 व 2 या अंकांच्या सहाय्याने पुन्हा खेळा.

प्रत्येक वेळी तुम्ही खात्रीपूर्वक जिंकाल असा एखादा अंक तुम्ही शोधू शकाल का ?

बेरीज कोष्टक

खालील कोष्टकाचे निरीक्षण करा आणि ते कोष्टक कसे तयार केले आहे यावर चर्चा करा

+	0	1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
0	0	1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
1	1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
2	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14
3	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15
4	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16
5	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17
6	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18
7	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19
8	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20
9	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20	21
10	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20	21	22
11	11	12	13	14	15	16	17	18	19	20	21	22	23
12	12	13	14	15	16	17	18	19	20	21	22	23	24

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

1. कोष्टकामधील काही पदबंध ओळखा

2. कोष्टकामध्ये 9 हा अंक असलेल्या चौकटींचे निरीक्षण काळजीपूर्वक करा. 9 हा अंक तुम्हाला कितीवेळा आलेला दिसला

   इतर अंकांचे काय ?

3. कोष्टकामध्ये फक्त सम संख्या किंवा फक्त विषम संख्या असलेल्या रांगा किंवा स्तंभ आहेत का ? तुमची निरीक्षणे स्पष्ट करून सांगा.

4. कोष्टकामध्ये लाल रंगाने रेखांकित केलेल्या चौकटीकडे पहा.

   a) प्रत्येक ओळीमधील दोन संख्यांची बेरीज करा.

   b) प्रत्येक स्तंभामधील दोन संख्यांची बेरीज करा.

      तुम्हाला काय दिसून आले ?

   c) आता चौकटीच्या कर्णावरील बाणांनी दाखविलेल्या दोन्ही संख्यांची बेरीज करा. तुम्हाला काय दिसून आले ?

   d) आता लाल चौकट कोष्टकामध्ये अन्य ठिकाणी रेखांकित करा आणि वरीलप्रमाणे बेरीज करून पहा. तुम्हाला काय दिसून आले ?

5. कोष्टकामधील निळ्या चौकटीमध्येही असेच पदबंध सापडतात का पहा. ते ओळखा.

आदलाबदल करून मिळवा.

a) एक दोन अंकी संख्या घ्या, समजा 27 घेतली, त्यामधील अंकांचे स्थान बदल करा (72). आता त्या दोन्ही संख्या मिळवा.(99) ही कृती इतर कोणतीही संख्या घेऊन पुन्हा करा.

b) कोणतीही दोन अंकी संख्या त्यामधील अंकांचे स्थानबदल करून मिळविल्यास आपल्याला बेरीज किती मिळेल ?

c) अंकांचे स्थानबदल करून मिळविल्यास खालीलप्रमाणे बेरीज येईल अशा सर्व संख्यांची यादी करा.

   i) 55 ii) 88

© KTDS NOT TO BE REPUBLISHED

d) या प्रकारे मिळविल्यास आपल्याला बेरीज 3–अंकी संख्या मिळेल का ?

आपल्याला मिळणारी बेरीज 3 अंकी संख्या असलेली सर्वात लहान संख्या कोणती असेल ?

योग्य संख्यांचा वापर करून रिकाम्या जागा भरा.


a)



b)



c)



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

किती प्राणी आहेत ?




भारतात जैवविविधता मोठ्याप्रमाणात आढळते. वाघ, हत्ती आणि चित्ते यासारख्या विलुप्त होणाऱ्या प्रजातींसाठी भारत एक आश्रयस्थान आहे.

जगातील वाघांच्या एकूण संख्येच्या 3/4 वाघ आणि आशियाई हत्तींच्या एकूण संख्येच्या 3/5 हत्ती हे आपल्या देशात आहेत.

1. कर्नाटकामध्ये हत्तींची संख्या 6049 आहे आणि केरळमध्ये 3054 हत्ती आहेत. तर या दोन्ही राज्यातील मिळून हत्तींची एकूण संख्या किती ?

उत्तराचा अंदाज करा.



9 स + 9 दशक + 13 एकक

= 9 स. + 1 शतक + 0 दशक + 3 एकक

= 9103

	स.	श.	द.	ए.
		1	1	
	6	0	4	9
+	3	0	5	4
	9	1	10	13
	9	1	0	3


कर्नाटक आणि केरळ दोन्ही राज्यातील मिळून एकूण हत्तींची संख्या 9103 आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. तीन राज्यामध्ये सर्वाधिक संख्येने चित्ते सापडतात. गुजरात मध्ये 1355, कर्नाटकामध्ये 1131, आणि मध्यप्रदेश मध्ये 1817 चित्ते आहेत. या तीन्ही राज्यातील मिळून एकूण चित्ते किती होतील.

उत्तराचा अंदाज करा.

_____



3 स. + 12 श. + 9 द. + 13 ए.

= 4 स.+ 2 श. + 10 द. + 3 ए.

= 4 स. + 3 श. + 0 द + 3 ए

= 4303

या तिन्ही राज्यामधील एकूण चित्यांची संख्या 4303 आहे.

	स.	श.	द.	ए.
	1	1	1	
	1	3	5	5
	1	1	3	1
+	1	8	1	7
	4	13	10	13
	4	3	0	3

3. महाराष्ट्रामध्ये 444 वाघ आहेत. मध्यप्रदेशमध्ये महाराष्ट्रापेक्षा 341 वाघ जास्त आहेत. उत्तराखंडमध्ये महाराष्ट्रापेक्षा 116 वाघ जास्त आहेत.

लक्षात ठेवा.

10 ए = 1 द

10 द = 1 श

10 श = 1 स

a) मध्यप्रदेशमध्ये एकूण किती वाघ आहेत?

□	ष.	द.	ए.
	4	4	4

b) उत्तराखंडमध्ये एकूण किती वाघ आहेत?

□	ष.	द.	ए.
	4	4	4

c) मध्य□प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांमध्ये मिळून एकूण किती वाघ आहेत?


□	स.	श.	द.	ए.

d) तिन्ही राज्यामधील एकूण वाघांची संख्या किती?

□	स.	श.	द.	ए.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षकांसाठी सुचना : विद्यार्थी स्वतंत्रपणे कोणत्याही साहित्याच्या वापराशिवाय अशा समस्या सोडविण्यास सक्षम होईपर्यंत शिक्षकांनी मुलांना टोकनचा वापर करून विविध समस्या सोडविण्यास मदत करावी मागील प्रकरणात सुचित केल्याप्रमाणे तुम्ही चौकट आकृत्यांचा वापर करून शाब्दिक समस्या सोडविण्यास मुलांना मदत करू शकता.



कमी की जास्त

1. आसाममध्ये 5719 हत्ती आहेत. तिथे मेघालयपेक्षा 3965 हत्ती अधिक आहेत. तर मेघालयमध्ये किती हत्ती असतील?

उत्तराचा अंदाज करा.
_____


आसाम : 5719

मेघालय : 3965 ⟷ **3965**

5719 – 3965

हे 5719 आहेत. यामधून 3965 वजा करा.

5719




	स.	श.	द.	ए.
	4	16	11	
	~~5~~	~~7~~	~~1~~	9
–	3	9	6	5
	1	7	5	4

मेघालयमध्ये 1754 हत्ती आहेत.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

2. 2022 च्या गणतीनुसार मध्यभारत आणि पूर्व घाटात चित्त्यांची संख्या 8820 होती. 2018 च्या गणनेनुसार त्याच प्रदेशातील संख्येपेक्षा ही संख्या 749 ने वाढलेली आहे. तर 2018 मध्ये चित्त्यांची संख्या किती होती?


उत्तराचा अंदाज करा.
_____



स.	श.	द.	ए.
◯	◯	◯	
▢	▢	▢	▢
			▢
▢	▢	▢	▢

2018 मध्ये चित्यांची संख्या..... होती.

मागील पानावर दिलेल्या समस्यांमधील माहितीनुसार या नकाशावर योग्य त्या ठिकाणी प्राण्यांची संख्या भरा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला करून पाहू


1) काझीरंगा राष्ट्रीय उद्यानाच्या कार्यालयात खालीलप्रमाणे फलक लावण्यात आला होता.

काझीरंगा राष्ट्रीय उद्यानामध्ये आपले सहर्ष स्वागत	
महिना	**पर्यटकांची संख्या**
डिसेंबर	8591
नोव्हेंबर	6415
ऑक्टोबर	?

a) नोव्हेंबर पेक्षा डिसेंबर महिन्यात किती पर्यटक जास्त आले ?

b) ऑक्टोबर पेक्षा नोव्हेंबर महिन्यात 1587 पर्यटक जास्त आले असतील तर ऑक्टोबर महिन्यात किती पर्यटक आले असावेत ?

2) एका फलरसगृहात महिला खाली दर्शविल्याप्रमाणे वेगवेगळे फलरस तयार करतात.



फलरसाचा प्रकार	एका महिन्यात तयार केलेल्या बाटल्यांची संख्या
अननसाचा रस	1348
पेरूचा रस	
संत्र्याचा रस	
कृष्णफळाचा रस	4781

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

a) अननसरसाच्या बाटल्यांच्या संख्येपेक्षा पेरूरसाच्या बाटल्या 759 ने जास्त आहेत. तर पेरुरसाच्या बाटल्यांची संख्या किती?

b) संत्रारसाच्या बाटल्या पेरूरसाच्या बाटल्यांपेक्षा 1257 ने जास्त आणि कृष्णफळरसाच्या बाटल्यांपेक्षा 1417 ने कमी आहेत. तर त्या महिन्यात संत्रारसाच्या किती बाटल्या बनविल्या पेरू आणि संत्रारसाच्या एकूण बाटल्यांची संख्या ही कृष्णफळरसाच्या बाटल्यांच्या संख्येपेक्षा कमी आहेत की जास्त असतील? किती कमी किंवा जास्त असतील?


3) एका लहान शहरामध्ये 2022 सालामध्ये खालीलप्रमाणे वाहनांची नोंदणी झाली. खालील अटीनुसार वाहनांची संख्या शोधून काढा.

a) जीपच्या संख्येपेक्षा बसची संख्या 253 ने जास्त आहे. तर शहरातील एकूण बसची संख्या किती?

b) बसच्या संख्येपेक्षा ट्रॅक्टरची संख्या 5247 ने कमी आहे तर एकूण ट्रॅक्टरची संख्या किती?

c) ट्रॅक्टरच्या संख्येपेक्षा टॅक्सीची संख्या 1579 ने जास्त आहे तर टॅक्सींची संख्या शोधून काढा?

